दै. पुण्य नगरी दि. 08/04/2023

# चोरट्याच्या मुसक्या आवळल्या

**इस्लापूर/प्रतिनिधी**

सोन्याचे गंठन चोरुन पोबारा करणाऱ्या एका चोरट्याच्या मुसक्या इस्लापूर पोलिसांनी आवळल्या असून चोरीचा मुद्देमालही जप्त केला आहे.



शिवणीतील व्यापारी कोटलवार यांचे घर फोडून अज्ञात चोरट्यांनी ७५ ग्रॅमचे सोन्याचे गंठन व रोकड असा एकूण ३ लाख ७५ हजारांचा ऐवज लंपास केला होता. दि.२६ मार्च रोजी ही घटना घडली. या प्रकरणी इस्लापूर पोलिसांनी गुन्हा नोंदवून चोरट्यांचा शोध सुरु केला. शिवणीतील रहिवासी शेख समीर शेख सलीम कुरेशी २४ याने ही चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले.गुरुवारी त्याला ताब्यात घेतले असता त्याने चोरीतील दागिने व रोकड तेलंगणातील नातेवाईकाकडे ठेवल्याची कबुली दिली. त्या आधारे इस्लापूर पोलिसांनी निर्मलमध्ये जाऊन त्याच्या नातेवाईकाकडून सोन्याचे गंठन,चांदीचे दागिने व रोकड असा एकूण ३ लाख ७० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सपोनि रवी वाहुळे, उपनिरीक्षक भारत सावंत, संदीप साळवे, शिवाजी साखरे, अरुण मडावी, चालक अजीमोद्दीन यांनी ही कारवाई केली.आरोपीला किनवटच्या कोर्टात हजर केले असता त्याला पोलिस कोठडी मिळाली आहे. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे,अपर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे, विजय डोंगरे यांनी पोलिसांचे कौतुक केले आहे.